आवड आणि आत्मविश्वास असेल तर कुठलीही गोष्ट अवघड नाही

दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ








dainiklokaarambh@gmail.com



LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार २८ फेब्रुवारी २०२५ | अंक ८१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# ११ वर्षांपासून प्रेम प्रकरण, डिसेंबर महिन्यात लग्न पण त्यापूर्वीच प्रियकाराचे प्रेयसीवर चाकूने अनेक वार

## संशयातून हत्याचा प्रयत्न

विरार पूर्वेच्या गास कोपरी गावात राहणारा तरुण अक्षय जनार्दन पाटील याचे त्याच गावात राहणा-्या २३ वर्षीय भाविका भालचंद्र गावड हिच्यासोबत मागील ११ वर्षापासून प्रेमसंबध होते. अक्षय आणि भाविका यांनी सात जन्म एकत्र राहण्याचे ठरवले. त्यासाठी डिसेंबरमध्ये लग्न करण्याचा निर्णय घेतला. सुखी संसाराची स्वप्न पाहणा-्या भाविकाने लग्नाची तयारी सुरु केली होती.मात्र, अक्षय भाविकावर संशय घेवू लागला. दुस-्या मुलाशी भाविका व्हॉटसअपवर बोलत असते याचा त्याला राग आला. त्यानंतर संशयातून अक्षयने भाविकाला संपवण्याचा प्लॅन तयार केला.

प्रेम प्रकरणातून हल्ले होण्याच्या घटना गेल्या काही वर्षांमध्ये वाढल्या आहेत. मुंबईतील विरारमधील प्रेम प्रकरणातून प्रियकराने प्रेयसीवर जीवघेणा हल्ला केला. ११ वर्षांपासून दोघांचे प्रेम प्रकरण होते. येत्या डिसेंबर महिन्यात ते लग्न करणार होते. परंतु संशयातून त्याने जीवनसंगिनी होणा-्या प्रेयसीवर धारधार शस्त्राने अनेक हल्ले केले. यामध्ये ती तरुणी गंभीर जखमी झाली आहे. विरारमध्ये प्रेम प्रकरणातून घडलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली. संशयातून हत्याचा प्रयत्न विरार पूर्वेच्या गास कोपरी गावात राहणारा तरुण अक्षय जनार्दन



पाटील याचे त्याच गावात राहणा-या २३ वर्षीय भाविका भालचंद्र गावड हिच्यासोबत मागील ११ वर्षापासून प्रेमसंबध होते. अक्षय आणि भाविका यांनी सात जन्म एकत्र राहण्याचे ठरवले. त्यासाठी डिसेंबरमध्ये लग्न करण्याचा निर्णय घेतला. सुखी संसाराची स्वप्न पाहणा-्या भाविकाने लग्नाची तयारी सुरु केली होती.मात्र, अक्षय भाविकावर संशय घेवू लागला. दुस-या मुलाशी भाविका व्हॉटसअपवर बोलत असते याचा त्याला राग आला. त्यानंतर संशयातून अक्षयने भाविकाला संपवण्याचा प्लॅन तयार केला. तरुणीवर खासगी रुग्णालयात उपचार विरारच्या रामभजन मेडिकल स्टोअर्समध्ये फार्मासीस्ट म्हणून मागच्या ४ महिन्यांपासून भाविका काम करीत होती. अक्षय २६ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास तिच्याकडे आला. त्याने तिच्या हातावर आणि मनगटावर चाकूचे वार केले. रागाच्या भरात लाथांनी मारहाण केली. त्यात तिचा जबडा फॅक्चर झाला आहे. या प्राणघातक हल्ल्यात तरुणी गंभीर जखमी झाली आहे.

# संतोष देशमुख हत्या प्रकरणी दीड हजार पानांचं आरोपपत्र दाखल

बीड दि.२७ (प्रतिनिधीर) संतोष देशमुख हत्या प्रकरणी, जवळपास दीड हजार पानांचं आरोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आलं आहे. पवनचक्की खंडणी प्रकरण आणि अॅट्रॉसिटी प्रकरणातही दोषारोपपत्र दाखल झालं. यावेळी सीआयडीचे अतिरिक्त महासंचालक बसवराज तेली आणि एसआयटीचे प्रमुख किरण पाटील न्यायालयात उपस्थित होते. आता सरपंच हत्येचा खटला कोर्टात चालणार असून, विशेष सरकारी वकील उज्वल निकम हे हा खटला लढवणार आहेत. वाल्मिक कराडचा संतोष देशमुख हत्या प्रकरणातला सहभाग आणि त्याचे पुरावे. सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करणारे सात आरोपींनी कशाप्रकारे हात त्याचा कट रचला आणि हत्या केली याचे पुरावे. या हत्याकांडामध्ये कुणाकुणाचा सहभाग आहे याचा तपास. संतोष देशमुख यांच्या हत्येचा मूळ कारण समोर येणार. खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड आणि विष्णू चाटे यांचा संतोष देशमुख हत्या



प्रकरणातील सहभाग आहे का याचाच तपास समोर येणार. खंडणी प्रकरण त्यानंतर ट्रॉसिटी प्रकरण आणि त्यानंतर हत्या प्रकरण या तिन्ही प्रकरणाचा एकमेकाशी काही संबंध आहे का याचे पुरावे. या प्रकरणातील आरोपींना फरार होण्यात कोणी सहकार्य केले आरोपी फरार झाल्यानंतर कुठे होते काय केले यासंदर्भातील ही सत्य दोषारोप पत्रातून समोर येणार. सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करताना आरोपींनी वापरलेले शस्त्र आणि हत्या नेमकी कशा पद्धतीने झाली याचेही सत्य समोर येणार. संतोष देशमुख हत्या प्रकरणात पोलिस प्रशासनातील काही अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केली का आणि दोषी आहेत का याचेही सत्य सीआयडीच्या तपासातून समोर येणार. या प्रकरणाशी संबंधित असलेल्या कुणाकुणाची चौकशी झाली हे देखील दोषारोप पत्र मधून समोर येणार. वाल्मिक कराडने खंडणी प्रकरणातून जमा केलेल्या संपत्ती संदर्भातील माहिती देखील समोर येण्याची शक्यता. वाल्मिक कराड, सुदर्शन घुले यांच्या संघटित गुन्हेगारीचे आणखी काही प्रकार घडले होते का? तसेच आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी यासंदर्भातही आरोप पत्रात सविस्तर माहिती. डिजिटल पुरावा मधून या प्रकरणाशी संबंधित असलेल्या आणि सीडीआर मधून या प्रकरणाशी कुणाकुणाशी संपर्क झाला हे देखील सत्य समोर येऊ शकते.

# विधिमंडळ रुग्णालय समितीचे अध्यक्षपदी नमिता मुंदडा यांची वर्णी



- वृत्तसंस्था /मुंबई:-राज्य विधिमंडळाच्या विविध समित्यांची घोषणा करण्यात आली. यात धम र्दाय खाजगी रुग्णालय तपासणी समितीच्या अध्यक्षपदी केज विधानसभा मतदारसंघाच्या आम दार नमिता मुंदडा यांची नियुक्ती झालीय. यावेळी मात्र पुन्हा एकदा सुरेश धस यांना डावलण्यात आले आहे.. मुख्यमंत्र्या शी चांगलीच जवळीक असलेल्या सुरेश धस यांना यापेक्षा मोठ्या पदाची संधी दिली जाणार असल्याची ही चर्चा चालू आहे राज्य विधिमंडळात विविध प्रकारच्या समित्या असतात. यात महायुतीत भाजपच्या वाटेला ११ समित्या आल्या आहेत. या समित्यांवरील अध्यक्षांची निवड भाजपाकडून करण्यात आली. अद्याप राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेच्या वाटेला आलेल्या समितींची घोषणा बाकी आहे. दरम्यान भाजपला मिळालेल्या समि त्यांपैकी धर्मादाय खाजगी रुग्णालय तपासणी समितीच्या अध्यक्ष म्हणून आमदार

# जातीयवाद संपविण्यासाठी पाऊल,बीड पोलिसांना मिळेल फक्त पहिल्या नावाची नेमप्लेट!

--बीड /प्रतिनिधीः- जिल्ह्यातील जातीयवाद संपविण्याआधी पोलिसांच्या मनातून मजातफ काढण्यासाठी पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी पहिल्या नावाने बोलण्याचा आदेश काढला. त्यानंतर आणखी एक पाऊल पुढे टाकत कार्यालयीन व प्रत्येक ठाण्यातील अधिकारी, कर्मचा-यांच्या टेबलवर आता पहिल्या नावाची पाटी लागणार आहे. त्यामुळे सामान्य लोकही पहिल्या नावाने बोलतील आणि कोणाचीही मजातफ समजणार नाही. यातून सलोखा वाढणार आहे. लोकसभा निवडणुकीपासून



जिल्ह्यात जातीयवाद वाढला आहे. विधानसभेत तो आणखी बळकट झाला. सध्या तर पोलिस दलातील काही अधिकारी,कर्मचा-ांवरही मजातीफचे आरोप होत आहेत. असे असतानाच ९ डिसेंबर २०२४ रोजी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली आणि पोलिस अधीक्षक बदलले. २१ डिसेंबर २०२४ रोजी नवनीत काँवत यांची बीडला नियुक्ती झाली. त्यांनी आगोदर पोलिस अधिकारी, कर्मचा-्यांना पहिल्या नावाने बोलण्यासंदर्भात आदेश काढून आवाहन केले. याला यशही आले. त्यानंतर आता त्यांनी प्रत्येक पोलिस अधिकारी, कर्मचारी यांच्या टेबलवर केवळ पहिल्या नावाची नेमप्लेट देण्याचा निर्णय घेतला आहे. १ मार्च पासून याची अंमलबजावणी होणार आहे.काय आहे संकल्पना ? आडनावाने बोलल्याने अनेकांची जात लक्षात येते. हे न समजता सलोखा राहावा, यासाठी पहिल्या नावाने बोलण्याची संकल्पना हाती घेतली. याला यश आल्यानंतर आता प्रत्येक पोलिस ठाण्यातील अधिका-यांसह बीट अंमलदारांना पहिल्या नावाची नेमप्लेट पोलिस दलाकडून दिली जाणार आहे. हे नाव निळ्या रंगात राहणार असून नावाच्या बाजूला ममहाराष्ट्र पोलिसफ असा लोगो असेल. अभिमान वाटावा आणि काम करण्याची प्रेरणा मिळावी, यासाठी हे केले जाणार आहे.

# लक्ष्मी मुंडे नर्सिंग स्कूलमध्ये राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

केज (प्रतिनिधी)-हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमीत्त लक्ष्मी नर्सिंग स्कूलच्या विद्यार्थ्यांनी भगव्या टोप्या घालून छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करुन ही शिवजयंती उत्साहाने साजरी केली. यावेळी संस्थेच्या सचिव उषाताई मुंडे, सहसचिव मधुर भैय्या मुंडे, प्राचार्य रवि पवारसर, शिक्षक कर्मचारी आणि



विद्यार्थिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.केज शहरापासुन जवळच असलेल्या बीड रोडवरील सिध्दीविनायक शैक्षणिक सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रमाकांत (बापू) मुंडे यांनी सुरु केलेल्या लक्ष्मी मुंडे नर्सिंग स्कूलमध्ये बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी म हाराज यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी दहा बाजता लक्ष्मी नर्सिंगस्कूलच्या प्रागंणामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला संस्थेच्या सचिव सौ.उषाताई मुंडे व सहसचिव मधुर भैय्या मुंडे यांनी पुष्पहार अर्पण करुन या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. प्राचार्य रवि पवार सर यांनी या कार्यक्रमाचे प्रस्ताविक व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचे महत्व सरांनी उपस्थितांना सांगीतले. या जयंती निमीत्त नर्सिंग स्कूलच्या विद्यार्थ्यांनी व विद्यार्थीनीनी भगव्या टोप्या घालून राजे छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन केले यावेळी शिक्षक व कर्मचारी सोनवणेताई, विद्यार्थीनी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

# मानव एकच जात, मानवता एकच धर्म-डॉ. सारिका क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी शहरातील ज्ञानसागर गुरुकुल येथे आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन व पालक मेळाव्याचे उद्घाटन करताना कल्पतरू प्रतिष्ठानच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी वर्तमान ,सामाजिक व राजकीय परिस्थितीचे वाभाडे काढताना मानव एक जात तर मानवता एकच धर्म असल्याचे अधोरेखित केले .आपल्या मुलांना बालमनावर संस्कार करणे गरजेचे असून मुलांना ऐतिहासिक व आध्यात्मिक कथा सांगून बालवयातच त्यांना सक्षम , सुसंस्कृत करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक प्राचार्य डी .जी. तांदळे यांनी मोबाईलचा वापर मुलांना घडवण्यासाठी व्हावा त्यामुळे ते बिघडणार नाहीत अशी काळजी घेण्याचा सल्ला देत ते पुढे म्हणाले की ,आपल्या पाल्यांना क्षमतेप्रमाणे आवडीच्या क्षेत्रात करिअर घडविण्यास मदत करावी असे आवजून सांगितले. पाली येथील इन्फंट इंडिया आनंदग्रामचे संस्थापक अध्यक्ष दत्ताभाऊ बारगजे यांनी मुलांना प्रेरणादायी मोलाचे मार्गदर्शन करून आशीर्वाद दिले. वडझरीचे सरपंच संजय सानप, ज्येष्ठ मार्गदर्शक मा. मुख्याध्यापक दिनकर सानप, मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे , जनता विद्यालय काकडहिराचे मुख्याध्यापक दिलीप कंठाळे, इंदिरा प्राथमिक विद्यालय उद्यालयाचे मुख्याध्यापक कदम सर, सरस्वती विद्यामंदिर गोरे सर, ह भ प वाघमोडे महाराज, अविनाश सोनवणे , आंतरराष्ट्रीय योग खेळाडू राधाताई तांबे, जीनियस इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका पल्लवी देशपांडे, सौ. मयुरीताई बांगर, सुख सावली दिव्यांग व वृद्धाश्रमचे संचालक माऊली शिरसाट, यांनी प्रसंगोचित मनोगत व्यक्त केले. पाटोदा येथील पालक गोरक्षक संतोष गर्जे तालुका पाटोदा येथे रोटी बँक द्वारे अनाथ निराधारांना नित्यदिनी अन्नदान करत असल्याबद्दल त्यांचा पुष्पगुच्छ देऊन दत्ता बारगजे यांनी सत्कार केला .तसेच विविध कला गुणा मधील गुणी मुला-मुलींचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. गुरुकुलच्या सर्व शिक्षक शिक्षिका व इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेऊन पालक मेळावा व स्नेहसंमेलन यशस्वी केला .कार्यक्रमास पालक मुकादम आश्रुबा राजपुरे, बाळू गोरे ,विष्णू नागरगोजे ,भाऊसाहेब दराडे, भीमराव नागरगोजे ,कोरडे रामकिसन, ईश्वर सानप, दादासाहेब शेंबडे आदी सानप , सूत्रसंचालन सौ. स्वाती सानप



पालकासह विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते . कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश तर आभार डॉ. संजय तांदळे यांनी मानले.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २८ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

# माझी माय मराठी

(संपादकीय) नुकताच मराठी राजभाषा दिवस पार पडला, दरवर्षी २७ फेब्रुवारीला कवी वि.वा. शिरवाडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने मराठी राजभाषा दिन राज्यात सर्वत्र उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी आणि या दिवसाच्या निमित्ताने सर्वत्र मराठीचा बोलबाला असतो, मराठीत स्वाक्षरी करण्याच्या मोहीमा राबवल्या जातात, मराठी बोलण्याचा अट्टाहास केला जातो, मराठी पाट्यांचा प्रश्न ऐरणीवर येतो, मराठीतून शुभेच्छा देण्याचे आवाहन केले जाते. मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याने यंदाचा उत्साह यापूर्वीपेक्षा अधिक दिसून आला. मात्र हा दिवस सरला की पुढे वर्षभर कोणी मराठीविषयी काहीच बोलताना दिसत नाही, त्यामुळे मराठी भाषाभिमानही अन्य मडेजफप्रमाणे केवळ एक दिवसापुरता सीमित राहिला आहे. मराठी भाषा बोलणारे देशभरात सुमारे नऊ कोटी तर भारताबाहेर अडीच कोटीहुन अधिक लोक आहेत. भारतात चौथ्या क्रमांकाची तर जगात दहाव्या क्रमांकाची भाषा म्हणून मराठीला गौरविले जाते. आज मराठी भाषेला महाराष्ट्रातच घरघर लागली आहे याचे कारण आपलाच व्यवहारातील मराठीचा वापर कमी होत चालला आहे. एकीकडे मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत, तर दुसरीकडे इंग्रजी माध्यमांच्या आणि कॉन्व्हेंट शाळांना अच्छे दिन आले आहेत. पाल्यांवर लहानपणापासून इंग्रजीची सक्ती करून आपण केवळ मराठीला डावलतो आहोत असे नव्हे, तर पाल्यांचा बौद्धिक विकासही खुंटत आहोत हे आपल्या केव्हा लक्षात येणार ? जेव्हा व्यवहाराची आणि शिक्षणाची भाषा एक असते तेव्हाच त्या भाषेचे वैभव आणि त्यातील शब्दसंपदा, खऱ्या अर्थाने आपल्या लक्षात येऊन ती भाषा आपल्या भाव भावना व्यक्त करण्याचे, संवेदना जाणून घेण्याचे, विचार व्यक्त करण्याचे साधन बनते. आजमितीला चारचौघांत इंग्रजी भाषेत संभाषण साधने प्रतिष्ठेचे समजले जाते. प्रतिष्ठेची ही व्याख्या आपणच तयार केली आहे ना ? आपल्याला फारसे इंग्रजी येत नाही म्हणून महाराष्ट्रात मराठी माणूस न्यूनगंड बाळगू लागला आहे. इंग्रजी भाषेत अस्खलित बोलण्यास शिकवणा-या शिकवण्या जागोजागी तयार होऊ लागल्या आहेत त्यामध्ये मोठ्या संख्येने मराठी तरुणच दिसून येतात. ही गरज कोणी निर्माण केली ? शाळांमध्ये मुलांना भरती करण्याआधी त्यांच्या पालकांना इंग्रजी येते का हे पाहण्यासाठी प्रथम पालकांच्या मुलाखती घेतल्या जातात. अनेक मोठ्या कंपन्यांमध्ये नव्याने नोकरीस लागणा-या मराठी माणसाला आज इंग्रजी मुलाखतीला सामोरे जावे लागते. साधे सिम कार्ड घ्यायचे झाले, तरी त्याचा अर्ज इंग्रजीत भरावा लागतो. महाराष्ट्रात कुठल्याही क्षेत्रात आणि कोणत्याही संदर्भात निवेदन द्यायचे असेल किंवा अर्ज भरायचे असतील, तर त्यासाठी प्रथम पर्याय मराठीचाच असायला हवा ही सक्ती महाराष्ट्रात का केली जात नाही. आज मॉल किंवा सुपर मार्केट या ठिकाणी ग्राहकांशी नीट संवाद साधता यावा यासाठी हिंदी आणि इंग्रजी चांगले येणा-या तरुण तरुणींना नोकरीवर ठेवले जाते त्यासाठी त्यांना मराठी मुलांना नोक-या मिळत नाहीत. ही स्थिती कोणी निर्माण केली ? महाराष्ट्रात राहायचे तर मराठी यायलाच पाहिजे. नीट बोलता नाही आले, तरी मराठी समजायला तर हवेच. आपल्या मातृभाषेला आलेल्या या अवकळेला आपण मराठी भाषिकच कारणीभूत आहोत. आपल्या मातृभाषेविषयी आपली अशीच उदासीनता राहिली, तर पुढच्या पिढीवर मातृभाषेचे संस्कार कसे होतील? आज मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत. घरोघरी आई, बाबा, काका, मामा या गोड नात्यांची जागा आता मम्मा, डॅडा, आंटी, अंकलने घेतली आहे. मुलांना असे म्हणण्यास पालकांकडूनच प्रवृत्त केले जात आहे. मराठी सणांचे महत्व कमी होऊन फेब्रुवारीतील मडेजफ उत्साहाने साजरे होऊ लागले आहेत, नाताळात घरोघरी ख्रिसमस ट्री येऊ लागले आहेत, मराठी घरात नववर्ष गुढीपाडव्यापेक्षा एक जानेवारीला अधिक उत्साहाने साजरे होऊ लागले आहे. घरोघरी वाढदिवस हिंदू कालगणनेनुसार तिथींना नव्हे तर इंग्रजी तारखांना साजरे होऊ लागले आहेत. मराठी भाषेला जपायचे असले तर सर्वप्रथम मराठी संस्कृती आणि मराठी अस्मिता जपणे अधिक महत्वाचे आहे आणि त्याची सुरुवात प्रत्येक मराठी माणसाने स्वतःपासून आणि आपल्या कुटुंबापासून करायला हवी. ममराठी बोला, मराठी जगा आणि मराठी वागाफ या नीतीचा अवलंब राज्यात सर्वच ठिकाणी केला गेला तरच येणा-या काळात मराठी भाषेला तिचे पुनर्वैभव प्राप्त होईल.

# विद्यार्थी विज्ञानाकडे आकर्षित झाले पाहिजे!!

सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ.वसंतराव गोवारीकर सन १९८७ साली भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान खात्याचे सचिव असताना त्यांनी ज्या अनेक योजना सुरू केल्या त्यातील एक योजना म्हणजे देशात विज्ञानाचे वातावरण निर्माण करण्यासाठी दरवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करणे. डॉ.वसंतराव गोवारीकरांच्या मनात आले की भारतात विज्ञानाचा एकमेव नोबेल पुरस्कार डॉ.सी.व्ही. रामन यांना मिळाला आहे, तर त्यांच्याशी संबंधितच तो दिवस असावा. शिवाय तो त्यांचा जन्म अथवा मृत्युदिन निवडण्यापेक्षा त्यांनी ज्या दिवशी त्यांचा निबंध जगप्रसिद्ध नेचर या विज्ञान मासिकाला पाठवला आणि ज्याला पुढे सन १९३० साली नोबेल पुरस्कार मिळाला ती तारीख का निवडू नये? अखेर जी तारीख निघाली ती २८ फेब्रुवारी ही होय. डॉ. सी.व्ही. रमन यांचा जन्म तामिळनाडूमधील तिरुचिरापल्ली आणि शिक्षण चेन्नई येथे झाले. त्यांनी कोलकाता विद्यापीठात सन १९१७-१९३३ भौतिकशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. डॉ.रमन हे काही काळ बंगलोरातही होते, १९४७ साली ते रमन संशोधन संस्थेचे संचालक झाले. त्यांचे दि.६ मे १९०७ रोजी लोकासुंदरी अम्मलबरोबर लग्न झाले होते. त्यांना चंद्रशेखर आणि रेडिओ खगोलशास्त्रज्ञ राधाकृष्णन हे दोन पुत्र होते. डॉ.रमन हे चंद्रशेखर सुब्रह्मण्यन यांचे काका होते. सन १९८३मध्ये चंद्रशेखर यांना भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले. त्यांनी आयुष्यभर दगड व अन्य खनिज पदार्थांचे विस्तृत वैयक्तिक संग्रह जमा केला आणि या खनिजांच्या प्रकाश-विकिरणाच्या गुणधर्मांचा अभ्यास केला. यासाठी त्यांना काही साहित्य देशभरातून व विदेशातून भेट म्हणून मिळाले. नमुन्यांचा अभ्यास करण्यासाठी डॉ. सी.व्ही.रमन अनेकदा लहान हाताळण्याएवढा स्पेक्ट्रोस्कोप घेऊन जात असत. हिंदू तमिळ ब्राह्मण पालकांच्या पोटी जन्मलेले रमन हा एक अनमोल मुलगा होता. त्याने सेंट अलॉयसियसच्या अँग्लो-इंडियन हायस्कूलमधून अनुक्रमे ११ आणि १३ वर्षांचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. वयाच्या १६ व्या वर्षी प्रेसिडेन्सी कॉलेजमधून भौतिकशास्त्रात सन्मानाने त्यांनी मद्रास विद्यापीठात पदवी परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावला. पदवीधर विद्यार्थी असताना सन १९०६ साली त्यांचा पहिला संशोधन पेपर प्रकाशित करण्यात आला. पुढच्या वर्षी त्यांनी एमएची पदवी मिळवली. कोलकाता येथील इंडियन फायनान्स सर्व्हिसमध्ये असिस्टंट अकाउंटंट जनरल म्हणून रुजू झाले, तेव्हा ते १९ वर्षांचे होते. तेथे त्यांची इंडियन असोसिएशन फॉर द अप्लाइन्शन ऑफ सायन्स- आयएसएस या भारतातील पहिल्या संशोधन संस्थेशी ओळख झाली, ज्यामुळे त्यांना स्वतंत्र संशोधन करण्याची परवानगी मिळाली आणि ध्वनी आणि ऑप्टिक्समध्ये त्यांनी मोठे योगदान दिले. रमन यांनी आयुष्यभर दगड व अन्य खनिज पदार्थांचे विस्तृत वैयक्तिक संग्रह जमा केला आणि या खनिजांच्या प्रकाश विकि रणाच्या गुणधर्मांचा अभ्यास केला. यासाठी त्यांना काही साहित्य देशभरातून व विदेशातून भेट म्हणून मिळाले. नमुन्यांचा अभ्यास करण्यासाठी डॉ.सी.व्ही.रमन अनेकदा लहान हाताळण्याएवढा स्पेक्ट्रोस्कोप घेऊन जात असत. ऑक्टोबर १९७०च्या शेवटी रमण त्यांच्या प्रयोगशाळेत कोसळले; त्यांना रुग्णालयात हलविण्यात आले आणि डॉक्टरांनी त्यांना चार दिवस जगण्यासाठी मुदत दिली. ते वाचले आणि काही दिवसांनी त्यांनी रुग्णालयात राहण्यास नकार दिला, कारण त्यांनी त्यांच्या अनुयायांनी वेढलेल्या त्यांच्या संस्थेच्या बागेमध्ये मरणे पसंत केले. रमनच्या मृत्यूच्या दोन दिवस आधी त्यांनी आपल्या एका माजी विद्यार्थ्यास सांगितले, अकादमीच्या नियतकालिकांना मरण येऊ देऊ नका, ते देशात विज्ञानाच्या गुणवत्तेचे संवेदनशील संकेतक आहेत. ती संध्याकाळ, रमन यांनी आपल्या संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाशी भेट घेण्यात आणि त्यांच्याबरोबर संस्थेच्या व्यवस्थापनासंबंधी कार्यवाहीबद्दल त्यांच्याशी चर्चा करण्यात घालवली. दि.२१ नोव्हेंबर १९७०च्या रात्रीनंतर रमन यांचा दुसऱ्या दिवशी पहाटे नैसर्गिक कारणांमुळे मृत्यू झाला. सन १९१७मध्ये कलकत्ता विद्यापीठाच्या राजाबाजार विज्ञान महाविद्यालयात आशुतोष मुखर्जी यांनी त्यांना भौतिकशास्त्राचे पहिले पालित प्राध्यापक म्हणून नियुक्त केले. आपल्या पहिल्या युरोप दौऱ्यात भूमध्य समुद्र पाहून त्याला समुद्राच्या निळ्या रंगाचे वर्णन करण्याची प्रेरणा मिळाली. त्यांनी १९२६ मध्ये इंडियन जर्नल ऑफ फिजिक्सची स्थापना केली. त्याने आणि कृष्णन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी प्रकाश विखुरल्याची एक अभिनव घटना शोधून काढली, ज्याला त्यांनी सुधारित विखुरणे असे संबोधले, पण त्याला रामन परिणाम म्हणून ओळखले जाते. भारत सरकारतर्फे दरवर्षी राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून हा दिवस साजरा केला जातो. रमन सन १९३३ साली बेंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये पहिले भारतीय संचालक बनले. तेथे त्यांनी त्याच वर्षी इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेसची स्थापना केली. त्यांनी सन १९४८ साली रमन रिसर्च इन्स्टिट्यूटची स्थापना केली. तेथे त्यांनी शेवटच्या काळात काम केले. त्यांच्या रमन परिणाम- प्रकाशाचे मॉलिक्युलर स्कॅटरिंग या शोधासाठी ते ओळखले जातात. सन १९३०चे भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक रमन यांना मिळाले होते. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे उद्दिष्ट असे की, लोकांच्या दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या विज्ञानाचे महत्त्व सांगण्यासाठी राष्ट्रीय विज्ञान दिन दरवर्षी साजरा केला जातो. मानवी कल्याणासाठी विज्ञान क्षेत्रात सर्व क्रियाकलाप, प्रयत्न आणि कृत्ये प्रदर्शित करणे. सर्व विषयांवर चर्चा करण्यासाठी आणि विज्ञान क्षेत्रात विकासासाठी नवीन तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करण्यासाठी हे साजरे केले जाते. देशातील वैज्ञानिक विचारांच्या नागरिकांना संधी देणे. लोकांना प्रोत्साहित करण्यासाठी तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान लोकप्रिय करण्यासाठी. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे मूळ उद्दिष्ट विद्यार्थ्यांना विज्ञानाकडे आकर्षित करणे आणि त्यांना प्रेरित करणे आणि विज्ञान आणि वैज्ञानिक कामगिरीबद्दल लोकांना जागृत करणे हा आहे. विज्ञानाशिवाय विकासाचा मार्ग वेगाने पुढे जाऊ शकत नाही. विज्ञान गैरसमज आणि अंधश्रद्धा नष्ट करते. विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रसिद्ध करण्यासोबतच देशातील नागरिकांना या क्षेत्रात संधी देऊन नवीन उंची गाठणे हा त्याचा मुख्य उद्देश आहे.

# वसुदेव( बप्पा ) गायकवाड मानद डॉक्टरेट पी.एच.डी. सन्मानीत

केज/ प्रतिनिधी

आनंदगांव ता. केज. जि. बीड येथील रहिवासी आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण, आनंदगाव ता. केज. जि. बीड व स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड चे संस्थापक, माजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, ख्यातनाम वक्ते व व्याख्याते वसुदेव( बप्पा) गायकवाड यांना १८ फेबुवारी २०२५ रोजी ङ्ग द ऑनररी डॉक्टरेट डिग्री ऑफ डॉक्टर इन सोशल वेलफेअर पी.एच.डी. डिग्रीने सन्मानीत करण्यात आले लेक्टर्न पीस अँड ह्युमन राईट्स नायजेरिया कडून हि मानद उपाधी देण्यात येवून वसुदेव आश्रुबा गायकवाड( बप्पा) यांनी सम्मानीत करण्यात आले.

१९९६ पासुन आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण व १९९७ पासून स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज. जि. बीड यां संस्थेला जोडून काम करत आहेत. तसेच महाराष्ट्रातील अनेक सामाजिक संस्था, सामाजिक, ग्रंथालयीन संघटना, विविध सामाजिक संस्थांच्या नेटवर्कला जोडून काम केलेले आहे. २९ वर्षापासून पूर्णवेळ सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत.

स्वयंसहायता समुहाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण, उन्हाळी शाळा, भटके - विमुक्त बालवाडी, रोपवाटिका, परसबाग, विवाहपूर्व समुपदेशन व विवाह पश्चात समुपदेशन, निरंतर शिक्षण केंद्र, निर्धूर चुल प्रकल्प, पाणी पुरवठा योजना, पाणलोट क्षेत्र विकास कामक्रम, गांडूळ खत प्रकल्प, जीवन अमृत सेवा प्रकल्प, कुक्कूटपालन प्रशिक्षण, दुग्ध व्यवसाय प्रशिक्षण, पर्यावरण जाणीव जाग्रती व कृती कामक्रम, आरोग्य विषयक, आहारविषयक प्रशिक्षण, आरोग्य शिबीरे, रक्तदान शिबीरे, नेत्रतपासनी शिबीर, समाजसेवा शिबीर, स्वयंरोजगार मागदर्शन शिबीर, विविध महिला, युवक, युवती, विद्यार्थी क्रिडा स्पर्धा, ग्रंथप्रदर्शन,



कारव्यान, कथाकथन, वक्तृत्व स्पर्धा, वाद - विवाद स्पर्धा, रंगभरण स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, परिसंवाद, चचासत्र,ग्रंथवाचन, विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम, अँड ऑन अक्टीव्हिटी, आविष्कार स्पर्धा, कायदे विषयक जनजागरण, पंचायत राज, ग्रामसभा सक्षमीकरण, पशु तपासनी शिबीर व तालुका स्तरीय पशुप्रदर्शन, ग्राम सच्छता अभियान या व अनेक प्रकारच्या उपक्रमाच्या अंमल बजावणीत सहभाग, शासकीय व अशासकीय विविध तालुका, जिल्हा, व विभाग पातळीवर, व राज्य पातळीवर कार्य संपूर्ण आयुष्य समाज सेवेसाठी वाहून घेतलेले आहे. निस्वार्थपणे व निरपेक्ष भावनेने पूर्णवेळ समाज कार्यात झोकून दिलेले आहे. आता वसुदेव( बप्पा ) गायकवाड हे डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड झालेले आहेत. याङ्ग डॉक्टर इन सोशल बेलफेअर ङ्ग झक.ऊ पदवीमुळे अधिक जोमाने व नव्या उमेदीने काम करण्याची प्ररणा मिळाली आहे, शेवटच्या स्वासापर्यंत आपण समाज सेवेतच काम करणार आहोत अशी प्रतिक्रिया माजी प्राचार्य डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड यांनी दिली.

# तारीख पे तारीख स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक: तारीख काही ठरेना!

वृत्तसंस्था : गेल्या चार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. ओबीसी आरक्षण आणि इतर कारणांमुळे या निवडणुका अद्यापर्यंत झालेल्या नाहीत. राज्यात विधानसभेच्या निवडणुका झाल्यानंतर पुढच्या काही महिन्यांतच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तारीखा जाहीर केल्या जाणार असे बोलले जात होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयात तारीख पे तारीख अशी परिस्थिती या निवडणुकीविषयी झालेली दिसत आहे.


नुकत्याच जाहीर झालेल्या तारखेत निवडणुकीच्या तारखांची घोषणा करण्यात येईल असे दिसत होते. मात्र, परत एकदा ५ मार्चला याची सुनावणी होणार आहे. यामुळे पुन्हा एकदा इच्छुकांचा हिरमूड झाला आहे. विधानसभेची धामधुम संपल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दृष्टीने अनेकांनी तेव्हापासूनच सुरूवात केली. निवडणुका लांबणीवर पडल्याने पुन्हा एकदा इच्छुकांच्या पदरी निराशा आली आहे. राज्यातील सर्व स्थानिक संस्थांचा कारभार सध्या प्रशासनाच्या हाती असल्याने राजकीय पक्षांमध्ये चलबिचल सुरू आहे. ओबीस आरक्षणाच्या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी घेऊन निकाल दिल्यानंतर पुढील काही महिन्यात निवडणुका होतील, अशी

आशा निवडणूक लढवणा-यांना आहे. त्यामुळे राजकीय मंडळींच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी इच्छुकांकडून जोरदार तयारी करण्यात येत आहे. काही इच्छुकांनी तर गेल्या काही दिवसांपासून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. मकरसंक्राती निमित्त हळदी कुंकवाचे कार्यक्रम, देव दर्शन यात्रांचे नियोजन करण्यात आले आहे. ऑक्टोबरमध्ये या निवडणुका होऊ शकतात असे सांगण्यात आले आहे. ५ मार्चला सर्वोच्च न्यायालय निवडणुकीची तारीख जाहीर करणार का की पुन्हा एकदा पुढची तारीख मिळणार हे पाहणे महत्वाचे असणार आहे.

## अबॅकस मास्टर जिनियस विरेन संजीव पिंपळे...अबॅकस मधील सर्व ऐतिहासिक रेकॉर्ड तोडून

# वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय अबॅकस चॅम्पियनशिप मध्ये ट्रॉफीज, सायटेशन, कॅश प्राइजेस मिळवलेला जागतिक स्तरावरचा यशस्वी अबॅकस विद्यार्थी म्हणून नावलौकिक मिळवले.

बीड (प्रतिनिधी) आंतरराष्ट्रीय स्तरावरील कोणत्याही जागतिक अबॅकस मॅथ ओलंपियाड चॅम्पियनशिप सर्व प्रकारच्या परीक्षांमध्ये भरभरून यश मिळवणारा एकमेव विद्यार्थी म्हणजेच विरेन संजीव पिंपळे होय. बालकांच्या विविध कलागुणांना व्यासपीठ देण्याच्या उद्देशाने, सुप्तगुणांचा विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होतो. देशामध्ये जापनीज किंवा अमेरिकन अबॅकस किंवा रशियन अबॅकस किंवा लंडन अबॅकस सर्वप्रचलित अबॅकस मध्ये अव्वल क्रमांक मिळवणारा आणि गणिताबद्दलची कोणतीही भीती नसणारा विद्यार्थी म्हणजेच विरेन संजीव पिंपळे होय. विरेन पिंपळेला अबॅकसची जास्त शिकवण असल्यामुळे त्याच्या शाळेमध्ये सुद्धा तो सतत प्रथम क्रमांकाचा विद्यार्थी असून त्याने अबॅकसचा उपयोग विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास सातत्यपूर्ण अभ्यासातील क्षमता वाढवण्यासाठी होतो असे सांगितले आहे. अबॅकस आणि वैदिक मॅथ्स सारख्या पद्धतीमुळे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये मग ती जपान कॉम्पिटिशन किंवा कोणतीही वर्ल्ड चॅम्पियनशिप असो त्यामध्ये प्रथम क्रमांक जसे की दिल्ली येथील जागतिक अबॅकस स्पर्धा, कर्नाटक जानेवारी आणि फेब्रुवारीमध्ये झालेल्या जागतिक स्पर्धा, अबॅकस सेंटर मधील लेवल मधील स्पर्धा यामध्ये त्याने गोल्ड मेडल प्रशस्तीपत्र आणि कॅश प्राइजेस मिळवलेले असून प्रतिष्ठित व्यक्तींद्वारे त्याचा सत्कार करण्यात आलेला आहे. जागतिक स्तरावरील चेअरमन इंटरनॅशनल अबॅकस इन्स्टिट्यूट ओसाका जपान, मियाजमा अबॅकस इन्स्टिट्यूट ओसाका जपान, तैवान चेंबर्स ऑफ कॉमर्स, ओसाका चेंबर्स ऑफ कॉमर्स, पेन पॅसिफिक अबॅकस चीन तसेच अबॅकस अर्थमॅटिक अकॅडमी, ब्रेन अबॅकस



राजस्थान, मेमरी मेंटल अबॅकस कर्नाटक यांच्या आंतरराष्ट्रीय अबॅकस असोसिएशन सहकार्याने व समन्वयाने २६ जानेवारी २०२५, आणि फेब्रुवारी मधील जागतिक चॅम्पियनशिपमध्ये दहा मिनिट आणि पाच मिनिटांमध्ये अचूक प्रश्नाचे उत्तर देऊन जागतिक स्तरावर चॅम्पियन सोफ्ट चॅम्पियन आणि रनर ऑफ फर्स्ट असे अनेक बक्षिसे मिळवलेले आहेत. वीरेन संजीव पिंपळेच्या यशामध्ये त्याच्या आईवडिलांचा शाळेतील शिक्षकांचा मित्रांचा सहकार्य पूर्ण खूप महत्त्वाचा भाग असून विरेनने यश त्याने या सर्वांना दिले आहे. अबॅकस स्टडी सेंटरच्या हॉलमध्ये त्याचा यशस्वी यथोचित सत्कार करताना श्री संतोष शेकडे, जोशी एस ए, विरेनच्या आईच्या आणि वडिलांच्या विविध सामाजिक ग्रुप कडून सुद्धा त्याचा सत्कार करण्यात आलाआहे. विरेंच्या शाळेतील सर्व शालेय समितीने


> विद्यार्थ्यांच्या उपजत गुणांचा विकास करण्यासाठी अबॅकस पध्दत फार उपयुक्त असून शालेय स्तरातील अभ्यासाला मुळातून मदत करण्याची, विद्यार्थ्यांच्या मनातील गणिताबद्दलची भीती दूर करण्यासाठी अबॅकस उपयुक्त आहे असे अबॅकस मास्टर ट्रेनर एस. ए. घोडके यांनी सांगितले

सुद्धा विरेन सर्व अबॅकस चॅम्पियनशिप मध्ये सर्वोत्कृष्ट क्रमांक मिळत असल्यामुळे त्याचा सत्कार केलेला आहे. अबॅकसच्या ऑनलाईन जागतिक स्पर्धेमध्ये जपान चीन साऊथ कोरिया तैवान, भारत, श्रीलंका, सौदी अरेबिया, इराण, नॉर्वे, यु एस ए, मोरोक्को, सिंगापूर, मलेशिया, साऊथ आफ्रिका, कॅलिफोर्निया, नेपाळ, अशा एकूण १५ ते २० देशांमधील पाच हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना सहभाग नोंदवला असून सदरील स्पर्धा आणि बक्षीस वितरण कार्यक्रम फेसबूक, इंस्टाग्राम ट्विटर, यूट्यूब, झूम अशा सर्व चॅनल्सवर प्रसारित करण्यात येत असतात आंतरराष्ट्रीय स्तरावरील अतिशय प्रतिष्ठित समजले जाणारी अबॅकस इंटरनॅशनल कौन्सिल यांनी सुद्धा सर्वोत्कृष्ट सततच्या मार्गदर्शनामुळे वीरेन पिंपळेचे यश प्राप्त करता आलेले आहे. आंतरराष्ट्रीय अबॅकस असोसिएशनचे आयोजकने विरेन संजीव पिंपळेने मिळवलेल्या यशाचे अभिनंदन उज्वल पांडा ओरिसा, जी एस एस श्रीनिवासन राव दिल्ली, राष्ट्रीय अबॅकस कार्याध्यक्ष श्री सतीश मुलगे तसेच अबॅकस स्टडी सेंटरचे प्रमुख डॉ. घोडके एस ए. अभिनंदन केले असून उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिलेल्या आहेत. समाजातील सर्व स्तरांमधून मयंकचे अभिनंदन होत असून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत. विरेन पिंपळे चे एप्रिल आणि मे २०२५ महिन्यात होणा-या लंडन चॅम्पियनशिप जर्मनी चॅम्पियनशिप तसेच ऑक्टोबर २०२५ ओरियंट अबॅकस इंटरनॅशनल चॅम्पियनशिप यु एस ए होणा-या इंटरनॅशनल अबॅकस चॅम्पियनशिप करीता निवड झालेली आहे असे जिल्हा अबॅकस वितरक एस. ए. घोडके यांनी सांगितले.

# संघर्ष पत्रकार संघांचे उपाध्यक्ष पत्रकार सचिन सारवरे यांची महाराष्ट्र रत्न गौरव आदर्श युवा पत्रकार पुरस्कारासाठी निवड

केज/प्रतिनिधीः-

संघर्ष पत्रकार संघांचे उपाध्यक्ष तसेच परळी वार्ताचे जिल्हा प्रतिनिधी पत्रकार सचिन सारवरे यांची दैनिक शिवजागर, विश्वनाथ फाउंडेशन व इन्फ-ोडड राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न गौरव आदर्श युवा पत्रकार पुरस्कार २०२५ साठी निवड करण्यात आली आहे हा पुरस्क-ार दि.२८ फेब्रुवारी २०२५ रजी सावित्रीबाई फुले स्मारक, सांस्कृतिक भवन गंजपेठ पुणे या ठिकाणी विविध मान्यवर यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात येणार आहे या कार्यक्रमाला उदघाटक म्हणून मा.ना.श्री. अतुलजी सावे साहेब, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध विकास अपारंपारिक ऊर्जा मंत्री, महाराष्ट्र राज्य, प्रमुख पाहुणे म्हणून मा. खा. श्री. निलेशजी लंके साहेब, खासदार अहिल्या नगर महाराष्ट्र राज्य, प्रमुख पाहुणे म्हणून मा. खा.श्री. बजरंग बप्पा सोनवणे साहेब खासदार बीड लोकसभा. मा. श्री. उद्धव बापू आपेगावकर साहेब, सुप्रसिद्ध पखावज वादक महाराष्ट्र राज्य, मा. श्री. श्रीकांत डिसले साहेब सहायक पोलीस आयुक्त छत्रपती संभाजी नगर याचबरोबर



अनेकमान्यवर उप-स्थित राहणार आहेत या कार्यक्रमाचे संयोजक अड. शंकर शेषेराव चव्हाण विश्वनाथ फाउंडेशन, दैनिक शिवजागर, इन्फ-ोडड यांनी केले आहे हे मागील अनेक वर्षा पासून सामाजिक, राजकीय, कला, सांस्कृतिक कीडा, पत्रकारिता, आदर्श ग्राम पंचायत, अशा अनेक क्षेत्रा तील चांगले कार्य करणाऱ्यांना पुरस्कार देऊन सन्मान करतात या वर्षीचा महाराष्ट्र रत्न आदर्श युवा पत्रक-ार पुरस्कार संघर्ष पत्रकार संघ केज चे उपाध्यक्ष पत्रकार सचिन धनराज सारवरे यांना मिळाल्या बद्दल त्यांचे सर्व क्षेत्रा-तील हितचिंतक यांच्याकडुन अभिनंदन करण्यात येत आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २८ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



# उपसरपंचपदी सौ. नीता तपसे यांची बिनविरोध निवड,

-के ज/वार्ताहर:-के ज तालुक्यातील चंदनसावरगाव ग्रामपंचायत च्या उपसरपंचपदी सौ. निता बालासाहेब तपसे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.दि.२५ फेब्रुवारी २०२५ रोजी निवडणूक प्रक्रिया झाली. ग्रामसेवक श्रीकांत कांबळे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. राजकारणात रमेशराव आडसकर यांच्या विश्वासू म्हणून निता बालासाहेब तपसे यांची ओळख आहे. उपसरपंचपदी निवड झाल्याबद्दल रमेशराव आडसकर यांनी सत्कार करूनशुभेच्छा दिल्या. निवडप्रक्रिया बैठकीस सरपंच सौ. उषा जालिंदर दळवी, ग्रामपंचायत सदस्य सत्वशिला शिवाजी तपसे, शारदा रामकिसन तपसे, रेखा आबासाहेब तपसे, विजयश्री दीपक वाघमारे, संजीव विठ्ठल तपसे, राम विठ्ठल तपसे, बालासाहेब मुकुंद गवळी, उत्तरेश्वर रामदास तपसे आदींची यावेळी उपस्थिती होती. गावच्या विकासासाठी कायम तत्पर राहून काम करणार असल्याची प्रतिक्रिया त्यांनी यावेळी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.



धाराशिव : मराठी राजभाषा दिनानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे वतीने धाराशिव शहरातील शम्सुल उलुम उर्दू स्कूल (गाजी स्कूल) येथील मराठी विषय शिकविणाऱ्या शिक्षकांचा पुष्प गुच्छ देऊन, मराठी राजभाषा दिनाच्या शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला, यावेळी मनसेचे जिल्हा सचिव कांबळे, मुख्याध्यापक सय्यद, सय्यद जुनैद खलील, बबनराव वाघमारे, वसंतराव गरड, विशाल बनसोडे,दादा धावारे उपस्थित होते.

# अश्वत्थलिंग शिवलिंग हा बीड जिल्ह्याचा ठेवा आहे-माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर



बीड दि.२७ (प्रतिनिधी) - पिंपळवंडी हे स्कंदपुराणात नोंद असलेले गाव आहे या ठिकाणी असलेले हे शिवलिंग शंभरावे शिवलिंग म्हणून ओळखले जाते हा बीड जिल्ह्याचा ठेवा असून याचे संवर्धन करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांचीच असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले आहे महाशिवरात्रीनिमित्त श्रीक्षेत्र अश्वत्थलिंग महादेव मंदिर देवस्थान पिंपळवंडी या ठिकाणी रामचरितमानस कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी या ठिकाणी भेट देऊन शिवलिंगाचे दर्शन घेतले यावेळी मठाधिपती महादेवानंद भारती महाराज यांनी संस्थांच्या वतीने भव्य स्वागत केले संस्थांमध्ये शिकत असलेल्या बालगोपाळांनी टाळ मृदंगाच्या गजरात अण्णांचे स्वागत केले यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की पिंपळवंडी हे स्कंद पुरणात नोंद असलेले गाव आहे या ठिकाणी असणारे शिवलिंग हे शंभरावे शिवलिंग म्हणून ओळखले जाते हा बीड जिल्ह्याचा ठेवा आहे याचे जतन करून संवर्धन करणे सर्वांची जबाबदारी आहे मंत्री पदाच्या काळात असताना या संस्थांना ब दर्जा मिळून देऊन संस्थांचा विकास आणि गावच्या विकासासाठी तलाव मंजूर करून आणले जेव्हा जेव्हा सत्ता मिळाली तेव्हा त्याचा उपयोग सत्कार्यात कसा करता येईल हाच विचार आपण केला या ठिकाणी जे विकास कामे केली आहेत त्याचा उपयोग भाविकांना सुविधा मिळवण्यासाठी झाला आहे अध्यात्मातील वैभव म्हणून क्षेत्रांची जपवणूक करणे गरजेचे आहे समाजाच्या कल्याणासाठी सत्तेचा उपयोग व्हायला हवा बीड जिल्हा कशाने पुढे आहे यापेक्षा अध्यात्माच्या दृष्टिकोनातून हा जिल्हा पवित्र आणि धार्मिक वृत्तीचा आहे हे मात्र नक्की आहे म्हणूनच विकासाची प्रक्रिया ही दीर्घकालीन आणि त्यासाठीच आपण प्रयत्न करत असतो यावेळी विलास बडगे दिनकर कदम अरुण डाके सुभाष शिरसागर नवनाथ कुलकर्णी सखाराम मस्के आदी उपस्थित होते.

# माहूरच्या भाविकांना अधिक उत्तम व तत्पर सेवा देण्यासाठी प्रयत्न करा-जिल्हाधिकारी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-माहूर : महाराष्ट्रातील भाविकांचे आराध्य दैवत असणारे माहूर आध्यात्मिक, धार्मिक आणि पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे केंद्र आहे. या ठिकाणच्या सोयी सुविधा व प्रस्तावित प्रकल्प काल मर्यादित पूर्ण करण्याकडे लक्ष दया, अशा सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले



यांनी माहूर येथे दिल्या.माहूर गडावर त्यांनी भेट दिली यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता भोकर प्रशांत कोरे,तहसीलदार किशोर यादव,मंदिर विश्वस्त उपस्थित होते. या ठिकाणी उभारल्या जात असलेला लिफ्ट व स्कायवॉकच्या कामाची पाहणी, गडावरील दुकानदारांच्या समस्या,रस्त्यांचे विस्तारीकरण, सुशोभीकरण तसेच माहुरच्या विविध ठिकाणी भेटी देताना श्रद्धाळू व पर्यटकांना येणा-या अडचणी याबाबत त्यांनी यावेळी उपस्थित अधिका-यांशी, विश्वस्तांची चर्चा केली.

प्राचीन ऐतिहासिक संदर्भ असणा-या माहूरगडासारख्या लोकप्रिय पर्यटन स्थळाला जिल्ह्याच्या वैभवात भर घालणा-या सोयी सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत. या परिसरातील अतिक्रमण, फेरीवाल्यांच्या समस्या आणि सर्व प्रलंबित प्रकल्प काल मर्यादेत पूर्ण करण्यात यावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

तत्पूर्वी त्यांनी माहूर गडावर रेणुका म तेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिरांच्या विश्वस्तांनी त्यांचे स्वागत केले.

# आ.सुरेश धसांना रूग्णालय समिती अध्यक्षपदावरून डावलले

बीड दि.२७ (प्रतिनिधी): आष्टी,पाटोदा, शिरूर मतदारसंघाचे आ.सुरेश धस एकीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे रोज कौतुक करत आहेत. दुसरीकडे मात्र भाजपा सुरेश धसांचेच खच्चीकरण करत आहे की काय? अशी चर्चा मतदारसंघात होत आहे. बीड नियोजन समितीच्या पहिल्या बैंठकीच्या दोन तास अगोदर आ.सुरेश धसांना डावलल्यानंतर आता धर्मादाय खासगी रुग्णालय तपासणी समितीवरून काढल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे नेमके भाजपाला आ.सुरेश धसांना काय करायचे आहे हेच कळेनासे झाले आहे. मात्र एकंदरीत दोन्ही समितीवर सुरेश धसांना काढल्याने आष्टी पाटोदा-शिरूर मतदारसंघात नाराजी वाढली आहे. तर वरील समितीवर केजच्या आमदाराची नियुक्ती केल्याचे दिसून आले. राज्य विधी मंडळाच्या विविध समित्यांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये धर्मादाय खासगी रुग्णालय तपासणी समितीच्या अध्यक्षपदी केज विधानसभा मतदार संघाच्या आ. नमिता मुंदडा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आ. सुरेश धस यांना भाजपने पुन्हा डावलले आहे. राज्य विधीमंडळात विविध प्रकारच्या समित्या असतात. यात महायुतीत भाजपच्या वाट्याला ११ समित्या आल्या आहेत. या समित्यांवरील अध्यक्षांची निवड भाजपकडून करण्यात आली आहे. अद्याप राष्ट्र वादी काँग्रेस आणि शिवसेनेच्या वाट्याला आलेल्या यापूर्वी नियोजन समितीवरही आमदार सुरेश धस यांना दिली नव्हती संधी समित्यांची घोषणा बाकी आहे. दरम्यान, भाजपला मिळालेल्या समित्यांपैकी धर्मादाय खासगी रुग्णालय तपासणी समितीच्या अध्यक्ष म्हणून बीड जिल्ह्यातील केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांची वर्णी लागली आहे. दुसऱ्यांदा आमदार झालेल्या आ. नमिता मुंदडा यांना स्थान देण्यात आले आहे. यापूर्वीही जिल्हा नियोजन समितीवर सदस्यांमधून विधीमंडळ होणाऱ्या नियुक्त्यांमध्ये आ. धस यांच्या ऐवजी नमिता मुंदडा यांनाच संधी दिली गेली होती.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात मराठी भाषा गौरव दिन व वि. वा. शिरवाडकर जयंती निमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी संपन्न.



केज/ प्रतिनिधी स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड येथे दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ रोजी वि. वा. शिरवाडकर जयंती अर्थात ङ्ग मराठी भाषा गौरव दिन ङ्गकाव्य वाचन, ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथवाचन, उत्स्फुर्त भाषण, व्याख्यान, चर्चासत्र, परिसंवाद इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रम घेवून ङ्ग मराठी भाषा गौरव दिनङ्ग मोठ्या उत्साहात व विद्यार्थी - विद्यार्थीनी, युवक - युवती, महिला - पुरुष, जेष्ठ नागरीक, वाचक, हितचिंतक, ग्रामस्थ यांच्या सहभागातून संपन्न झाला. अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, प्राचार्य, डॉ. वसुदेव ( बप्पा) गायकवाड हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून संजय सोनवणे, शंकर भोगनकर, दादाराव गायकवाड, रविन्द्र गायकवाड( पेंटर), रामराजे गायकवाड ( माजी सरपंच ), दादासाहेब गायकवाड, नारायणभाऊ गायकवाड, रावसाहेब गायकवाड, वैजनाथ गायकवाड, कल्याण गायकवाड, सुखदेव गायकवाड यांनी उपस्थित राहून वेगवेगळ्या सत्रात मार्ग दर्शन केले. ग्रंथप्रदर्शनात विद्यार्थी, युवक, जेष्ठ नागरिक यांनी सहभाग घेतला. काव्य वाचन, ग्रंथप्रदर्शन, व्याख्यान, ग्रंथवाचन, चर्चासत्र, परिसंवाद, इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले. सर्वच कार्यक्रमात मोठ्या संख्येने वाचक, हितचिंतक सहभागी झाले होते, सकाळी ९ ते ५ पर्यंत ङ्ग ग्रंथप्रदर्शन ङ्गचालले, इतर उपक्रम विविध टप्प्यात घेण्यात आले. सर्वप्रथम वि. वा. शिरवाडकर यांचा प्रतिमेचे पुजन पुष्चहार अर्पण करून मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक, सुत्रसंचलन, आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद( भैय्या) गायकवाड यांनी केले.

# अनैतिक देह व्यापार करणाऱ्या बार व लॉजवर पोलिसांचा छापा

कळंब दि.२७ (प्रतिनिधी): स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी हिमालय बार व लॉज कळंब येथे चार महिलानां वाणिज्यिक प्रयोजनाकरीता आश्रय देउन त्यांना ग्राहकांचे मागणी प्रमाणे लैंगीक समागमनाकरीता करीता पराववृत्त करुन त्यांना वैश्या व्यवसाय करण्यास भाग पाडून त्यांच्यावरती उपजिवीका करीत असल्याचे मिळून आले. पोलिसांनी ही छापा कारवाई दिनांक २५. २. .२०२५ रोजी केली व यातील पिडीत महिलांची सुटका करुन सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन आरोपी विजय परशुराम कदम , वय ४७ रा.शिक्षक कॉलनी कळंब ,जिल्हा धाराशिव , प्रशांत विठ्ठल काळे वय ४४ वर्ष रा. मंगरूळ तालुका कळंब जिल्हा धाराशिव , सल्लाउद्दीन दगडू शेख वय ३८ वर्ष राहणार चोंदे गल्ली कळंब तालुका कळंब जिल्हा धाराशिव. या व्यक्ती विरोधात भा.न्या.सं. कलम १४३, १४४ सह अनैतिक मानवी वाहतुक व व्यापार प्रतिबंध अधिनियम कलम ३, ४, ५ ६ अन्वये कळंब पो.ठा. येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे .

# चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा



बीड दि.२७ (प्रतिनिधी): मंगळवार दि. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी रामचंद्र संस्थानचे मठाधिपती रामानंद महाराज भारती, चंद्रकांत शेळके (तहसीलदार बीड), शिवाजी बंटेवाड साहेब (पोलीस निरीक्षक - बीड ग्रामीण) समंदर खान (गटशिक्षणाधिकारी. पं.स. बीड, बजरंगबली प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष किरण भगत, गणेश बहिर (केंद्र प्रमुख राजुरी नवगण) व सर्व जिल्हा परिषद शिक्षक, ग्रामस्थ व तिप्पटवाडी, मुर्शदपुर, रूईलिंबा, लिंबारूई शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थित पार पडला.

# माऊली दादांनी महाराष्ट्राला नम्रतेची शिकवण दिली लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे प्रतिपादन...

बीड प्रतिनिधी - महाराष्ट्रातील धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणा-या श्रीक्षेत्र चाकरवाडी मध्ये महाशिवरात्रीनिमित्त अखिल भारतीय वारकरी संमेलन तसेच दोन दिवसीय महोत्सव सुरू आहे.प्रमुख मार्गदर्शक तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य श्री ह.भ.प महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली महाशिवरात्री महोत्सव निमीत्त होणारे सर्व कार्यक्रम पार पडतील. या महोत्सवामध्ये विसाव्या शतकातील महान संत विभूती सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज श्रीक्षेत्र चाकरवाडीकर यांच्या पवित्र पावन भूमीमध्ये महाशिवरात्री महोत्सवानिमित्त पहिल्या दिवशी वारकरी संप्रदायातील कीर्तन परंपरेतील एक थोर विभूती मठाधिपती महंत श्री ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे श्री बंकटस्वामी महाराज मठ संस्थान श्री क्षेत्र निनगुर यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. ह. भ. प लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी जगद्गुरू तुकाराम महाराज यांच्या गाथा मधील अभंगावर चिंतन केलेत. तुम्ही विश्वनाथ । दीनरंक मी अनाथ १

कृपा कराल ते थोडी । पायां पडिलों बराडी ध्रु.

काय उणें तुम्हांपाशीं। मी तों अल्प चि संतोषी २

तुका म्हणे देवा । कांहीं भातुकें पाठवा ३हे देवा तुम्ही विश्वनाथ



आहात आणि मी तर दिन रंक अनाथ आहे. हे विश्वनाथ मी तुमचा भक्त आहे तुम्ही थोडी का होईना पण माझ्यावर दया करा. देवा तुम च्याजवळ भक्तांना देण्यासाठी काय उणे आहे आणि मी तर अल्प संतोषी आहे. तुकाराम महाराज म्हणतात हे देवा मला तुम्ही काहीतरी प्रेमरूपी भातुके म्हणजे खाऊ पाठवा. महाराजांनी आपल्या कीर्तन श्रावणेतून भाविकांना मंत्रमुग्ध केले. अशाप्रकारे महाराजांनी आपल्या अभंगातून भाविकांना संदेश दिला. अभंगावर चिंतन करून हरिहराचे दर्शन करून नाथाचे प्रकार कोणते आहे ? कृपेचे प्रकार किती ? अति महत्त्वाकांक्षामुळे भस्मासुराचा भस्म कसा झाला... महाशिवरात्री व शिव-पर्वामुळे चंड भिल्लाचा उद्धार कसा झाला. बोलताना महाराजांनी माऊली दादांनी महाराष्ट्राला नम्रतेची शिकवण दिली अशा प्रकारचे प्रतिपादन सुद्धा केले. माऊली दादा एक शिवाचे अवतार आहेत. माऊली दादा आणि सुदाम देव बाबा एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. यावेळी मृदुंगाचार्य नादब्रह्म वारकरी शिक्षण संस्थेचे राम महाराज काजळे, अमोल महाराज पवार चाकरवाडीकर, गायनाचार्य बिबीशन महाराज कोकाटे, गायनाचार्य श्रीहरीभाऊ महाराज काळे, गायनाचार्य महादेव महाराज रोडे, त्रिंबक महाराज शेळके, अमोल महाराज पवार, दिनेश महाराज काळे, राम महाराज गायकवाड, पांडुरंग महाराज शिंदे, श्रीनिवास महाराज खोसे, तसेच पंचक्रोशीतील भाविक भक्त नादब्रम्ह वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी उपस्थीत होते.

# श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान महाशिवरात्र महोत्सव! सोहळ्याची ह.भ.प.लक्ष्मण मेंगडे महाराजांच्या काल्याच्या किर्तनाने सांगता

लिंबागणेशः- ( दि.२७) बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्री क्षेत्र बेलेश्वर संस्थान मार्फत महाशिवरात्र महोत्सव प्रित्यर्थ दरवर्षी प्रमाणे दि.२० गुरुवार रोजी पासून पासून गुरूवर्य महंत मठाधिपती महादेव भारती महाराज आणि मठाधिपती शांतीब्रम्ह तुकाराम भारती महाराज यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण , महाशिवरात्री महोत्सव सोहळ्याची सांगता आज दि.२७ गुरुवार रोजी अध्यक्ष बंकटस्वामी संस्थान नेकनुर ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या सुश्राव्य अमृततुल्य दहिहंडीच्या कार्यक्रमाने अर्थात काल्याच्या किर्तनाने झाली.भगवान श्रीकृष्णांनी अवतार घेतल्यापासून बालपणी केलेल्या विविध लीलांचे वर्णन त्याचप्रमाणे अवतार संपेपर्यंत जीवनप्रवासावर प्रबोधन केले. विश्वाचे मुळ भगवान परमात्मा असुन हे विश्वची माझे घर या न्यायाने माणसाने वागायला हवे.भगवंताचे नामस्मरण करायला हवं.परमात्मा सर्व जगाचा मालक असुन उपाधी विरहित भगवान परमात्म्याच्या माध्यमातून विश्वाची निर्मिती झाली असा गोड संदेश त्यांच्या वाणीतुन भाविक भक्तांना संदेश देत मंत्रमुग्ध केले. यावेळी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अखंड हरिनाम सप्ताह कालावधीत वेगवेगळ्या विषयांवर खालिल नामांकित किर्तनकारांकडुन बबन महाराज मंझरीकर(हवेली), अक्षय महाराज पिंगळे बीड,राम ायणाचार्य एकनाथ महाराज गाडे चकलांबा, वारकरी भुषण राम म



हाराज डोंगर आळंदी, रामहरी महाराज वायबसे सावरगाव,प्रेममुर्ती धर्मराज (दादा) महाराज सामनगाव,विनोदाचार्य दिपक महाराज बादाडे माजलगाव यांची किर्तनाद्वारे समाज प्रबोधन करत सेवा संपन्न झाली.पंचक्रोशितील विविध गावांतील मृदुंगाचार्य, वारकरी,भजनी मंडळ यांच्या द्वारे हरिजागर आणि प्रवचने भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन बेलेश्वर संस्थान महाशिवरात्र उत्सव कमिटी बेलगाव, बेलगाव तरूण मंडळ, विश्वस्त मंडळ यांच्या वतीने करण्यात आले होते. किर्तनानंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

**राजकीय नेत्यांची उपस्थिती ; संस्थानच्या विकासासाठी भरीव योगदान देण्याचे आश्वासन**

------

बेलेश्वर संस्थान महाशिवरात्र महोत्सव सांगता सोहळ्यात राजकीय नेत्यांची लक्षणीय उपस्थिती होती.यावेळी खा.बजरंग बप्पा सोनावणे, शिवसंग्राम राष्ट्रीय अध्यक्ष ज्योतीताई मेटे, जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस राजेंद्र मस्के, शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष सुभाष जाधव,सभापती बळीआप्पा गवते,मराठा सेवक हनुमान मुळीक, पंचायत समिती सदस्य पिंटु ठोंबरे, बबन माने यांची उपस्थिती होती. संस्थानच्या वतीने महंत शांतीब्रम्ह तुकाराम महाराज यांनी शाल श्रीफळ व पुष्पहार घालून सत्कार केला. खा.बजरंग सोनावणे, ज्योतीताई मेटे, राजेंद्र मस्के यांनी संस्थानप्रती कृतज्ञता व्यक्त करत संस्थानच्या विकासासाठी भरीव योगदान देण्याचे आश्वासन दिले.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

# आधी गोळीबार अन् मग तलवारीने वार; शास्त्रीनगरमध्ये तरुणाचा खून

पुणेः पूर्ववैमनस्यातून टोळक्याने तरुणावर पिस्तुलातून गोळीबार करत तलवारीने वार करून खून केल्याची घटना कोथरूड भागातील शास्त्रीनगर परिसरात घडली आहे. गौरव अविनाश थोरात (वय २२, रा. मराठा महासंघ सोसायटी, शास्त्रीनगर, पौड रस्ता, कोथरूड) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी दिनेश भालेराव (वय २७), सोहेल सय्यद (वय २४), राकेश सावंत (वय २४), साहिल वाकडे (वय २५), बंड्या नागटिळक (वय १८), लखन शिरोळे (वय २७), अनिकेत उमाप (वय २२), यांच्यासह आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल केलेल्या आरोपींमध्ये एका अल्पवयीनाचा समावेश आहे. याबाबत सागर वसंत कसबे (वय ४७) यांनी कोथरूड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दरम्यान, कोथरूड भागात बुधवारी संगणक अभियंता तरुणाला गज्या मारणे टोळीतील गुंडांनी मारहाण केल्याची घटना ताजी असतानाच शास्त्रीनगर परिसरात झालेल्या खुनाच्या घटनेमुळे परिसरात घबराट उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गौरव आणि आरोपी सोहेल यांच्यात वाद झाले होते. गौरवने आरोपीपैकी एकाच्या पत्नीबरोबर वाद घातला होता. दोन दिवसांपूर्वी गौरव आणि सोहेल यांच्यात पुन्हा वाद झाला होता. रविवारी मध्यरात्री गौरव हा शास्त्रीनगर येथील दत्त मंदिराजवळ मित्रांसोबत बसला होता. त्या वेळी सोहेल सय्यद हा साथीदारांसह तिथे आला. सोहेलने त्याच्याकडील देशी बनावटीच्या पिस्तुलातून गौरवच्या दिशेने गोळी झाडली. गौरवला गोळी लागली नाही. त्यानंतर आरोपींनी तलवार आणि कोयत्याने गौरववर हल्ला केला. आरोपींनी त्याच्यावर वार केले. डोके, मान आणि पोटात वार करण्यात आल्यामुळे गौरव गंभीर जखमी झाला होता.

## टाटा अल्ट्रा मॅराथॉन मध्ये शरद खिल्लारे आणि संतोष भोकरे चमकले.




बीड प्रतिनिधी :-नुकत्याच दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी झालेल्या टाटा अल्ट्रा मॅराथॉन लोणावळा येथे राष्ट्रीय स्तरावर पार पडली यामधे देश विदेशातून ३००० धावपटूंनी सहभाग नोंदवला होता. ही स्पर्धा रात्री १.०० वा. सुरू झाली, अतिशय खडतर अशी ही मॅराथॉन ३५ आणि ५० किलोमीटर या अंतराची होती. या स्पर्धेत आपल्या जिल्ह्याचे प्रा.शरद खिल्लारे ही ४५ च्या पुढील वयोगटात ३५ किलोमीटर धावणे या प्रकारात ५ वा क्रमांक पटकावला. तसेच एलआईसी चे प्रशासकीय अधिकारी संतोष भोकरे हे १० वा क्रमांक पटकावला. या दोघांनाही बक्षीस म्हणुन मानाची अशी टाटा मॅराथॉन ची जर्सी देण्यात आली दोघानाही राष्ट्रीय/अंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक बक्षिसे मिळविले आहेत त्यांचे योगा प्रतिष्ठान तर्फे तसेच जिल्ह्यातून सर्व स्तरावर अभिनंदन करण्यात येत आहे. तसेच ५० किलोमीटर या स्पर्धेत श्री. गणेश नाईक ,हरी ठोंबरे, डॉ. विश्वास गवते ,आकाश कवडे यांनी यशस्वीपणे ही स्पर्धा पूर्ण केली आणि ३५ किलोमीटर मध्ये बाळासाहेब करांडे,जालिंदर बेद्रे, डॉ. अमोल मोराळे यानीही यशस्वीपणे स्पर्धा पूर्ण केली आहे.

# पाणी प्यायला गेला आणि अडकला, दत्तात्रय गाडेच्या मुसक्या कशा आवळल्या ?

### अखेर पोलिसांनी तपासाची चक्रं वेगाने फिरवत त्याला अटक केली.

पुण्यातील स्वारगेट बस स्थानकातील शिवशाही बसमध्ये का तरूणीवर बलात्कार झाल्याच्या घटनेने प्रचंड खळबळ माजली. याप्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे हा गेल्या तीन दिवसांपासून फरार होता. अखेर पोलिसांनी तपासाची चक्रं वेगाने फिरवत त्याला अटक केली. दत्तात्रय हा शिरूर येथील गावातील शेतात लपला होता. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांच्या १३ टीम तयार करण्यात आल्या होत्या. आरोपी हा गावातच लपल्याचं लोकेशन ट्रेस झाल्यानंतर तो गावातून पळू नये म्हणून गावात १०० पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला होता. तसेच ड्रोनच्या आणि डॉग स्क्वॅडच्या मदतीने त्याचा कसून शोध घेत अखेर त्याच्या मुसक्या आवळण्यात आल्या. तब्बल ४८ तासानंतर पोलिसांनी त्याला अटक केली आहे. डॉग स्क्वायड आणि ड्रोनच्या मदतीने त्याचा शोध घेण्यात आला. अखेर ४८ तासानंतर पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या आहेत. गुनाट गावातील ग्रामस्थांच्या मदतीने त्याला अटक केली. तो एका कॅनॉलमध्ये लपून बसल्याची माहिती मिळाली होती. गावातल्या शेतात अनेक तास शोधमोहिन केल्यानंतर अखेर त्याच शोध लागला. पोलिसांनी शेत पिंजून काढत त्याला बेड्या ठोकल्या. सध्या आरोपीला लष्कर पोलीस ठाण्याच्या





लॉकअपमध्ये आणून ठेवलं आहे. आज सकाळी ११ वाजता त्याला कोर्टात हजर करण्यात येणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ३७ वर्षीय आरोपी दत्तात्रय रामदास गाडे याला शिरूर, पुणे येथून अटक करण्यात आली आहे. रात्री उशिरा तो कोणाच्या तरी घरी जेवायला गेला होता, त्याच व्यक्तीने त्याची माहिती पोलिसांना दिली. गुरुवारी रात्री दीड वाजण्याच्या सुमारास आरोपीला अटक करण्यात आली असून त्याला आज पुणे न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची देखील माहिती मिळत आहे. धक्कादायक गोष्ट म्हणजे, आरोपीवर यापूर्वी देखील अनेक आरोप झाले आहेत. आरोपी गाडे याच्यावर यापूर्वी चोरी, दरोडा, चेन स्नॅचिंग यांसारखे गुन्हे दाखल आहेत. २०१९ मध्ये एका गुन्ह्यात आरोपीची जामिनावर सुटका झाली होती. आरोपी गेल्या दोन दिवसांपासून फरार होता.


फरार आरोपीला शोधण्यासाठी पोलिसांच्या १३ टीम तयार करण्यात आल्या होत्या. याप्रकरणी पुणे पोलिसांनी आरोपींची माहिती देणार्‍यास एक लाख रुपयांचे बक्षीसही जाहीर केलं होतं

## दयाधर्म सामाजिक प्रतिष्ठान हाळम संचलित स्पंदन २०२५ चे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन

परळी (प्रतिनिधी) दयाधर्म सामाजिक प्रतिष्ठानचे संचलित के.जी.जी. स्कूल अँड फिनिक्स पब्लिक स्कूल ,श्री वैद्यनाथ आय टीआय कॉलेज हाळम तालुका परळी वैजनाथ जिल्हा बीड चे स्पंदन २०२५ चे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ६:३० वाजता स्थळ: स्कूल व आय टी आय कॅम्पस हाळम करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक माजी आमदार संजय भाऊ दौंड ,अजय जी मुंडे गटनेते जिल्हा परिषद बीड, गोविंदराव फड मा. सभापती ,परळी पंचायत समिती



तथा सरपंच धर्मापुरी , विशेष उपस्थिती मा गणेश पाळवदे साहेब, जिल्हा क्रीडा अधिकारी छत्रपती संभाजी नगर,मा.हनुमंत फड केंद्र प्रमुख हाळम, कार्यक्रमाचे अध्यक्ष माधव मंचकराव मुंडे अध्यक्ष :दयाधर्म



सामाजिक प्रतिष्ठान हाळम, आदी मान्यवरांच्या उपस्थित होनार आहे. तरी विद्यार्थी विद्यार्थीनींनी पालक महिला पुरूष आदी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



आपले विनीत, कु ज्ञानेश्वरी फड कार्यवाहक, सोमेश मुंडे सर प्राचार्य,आय टी आय कॉलेज हाळम,बी. के. मोरे सर प्राचार्य.के. जी.जी. स्कूल हाळम, नवलकुमार वर्मा प्रशासकीय अधिकारी, संध्या चव्हाण मॅडम सांस्कृतिक विभाग ,प्रदीप पिंगळे सर, गोविंद दहिफळे सर, सुजित हाके सर,करूना वाघमारे मॅडम, राहुल पंडीत सर , आरती फड मॅडम, वैष्णवी दहिफळे मॅडम,सुमन सरवदे मॅडम, स्वप्नाली आव्हाड मॅडम, श्रीकृष्ण मुंडे सर, नागनाथ कातकडे सर, अमोल कातकडे सर, प्रतिक्षा मेंगले मॅडम, अक्षदा मुंडे मॅडम, वसंत होळंबे, हरिश्चंद्र मुंडे,शोभा मुंडे,सोनाली मुसळे, सोमेश्वर गुट्टे अतुल बाबुराव केंद्रे आदी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

## केज तालुक्यात माऊली ज्येष्ठ नागरिक संघाची स्थापना.. ज्येष्ठ नागरिकांना विचारमंच मिळणार.




केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांची सभा रविवार दि. २३ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ४-०० वाजता केज पंचायत समितीच्या सभागृहात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी केज पंचायत समितीचे माजी सभापती तथा स्वामी दयानंद प्रतिष्ठान केजचे संस्थापक अध्यक्ष ॲड.राजेसाहेब देशमुख यांची उपस्थिती होती.

उपस्थित सर्वांच्या विचार विनीमयातुन केज तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी संघटना स्थापन करण्याचे ठरले. ज्येष्ठ नागरिक गिन्यानदेव गदळे यांनी संघटनेचे नाव माऊली ज्येष्ठ नागरिक संघ असावे असे सुचविले उपस्थित ॲड. विजयकुमार कुलकर्णी यांनी नावास अनुमोदन दिले.

केज तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांनी संघटित होवून ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी व त्यांच्या विविध उपक्रमांना विचारमंच मिळवून देण्यासाठी या संघटनेची निर्मिती करण्यात आली.कार्यकारिणी मध्ये संघटनेचे अध्यक्ष म्हणून ॲड. राजेसाहेब देशमुख,गिन्यानदेव गदळे-सचिव,रामेश्वर जाजु-कोषाध्यक्ष,कापरे -उपाध्यक्ष, ॲड. विजयकुमार कुलकर्णी-कार्याध्यक्ष, सारखे-सहसचिव,मधुकरराव लांडगे -सहसचिव व सर्व सदस्य लक्ष्मणराव यादव, उद्धवराव तरकसबंद, लक्ष्मणराव जाधव, वासुदेवराव डोंगरे आदींचा समावेश आहे. या कार्यकारिणीस रमेशराव खंदारे,प्रा. हनुमंतराव भोसले,रामराव राऊत, वल्लभदास जाजु, रामचंद्र जाधव, प्रदिप कल्याणकर यांनी अनुमोदन दिले.माऊली ज्येष्ठ नागरिक संघाची वरिष्ठ कार्यालयात नोंद करणे व इतर आवश्यक कार्यवाहीचे सर्व अधिकार नवनिर्वाचित कोषाध्यक्ष रामेश्वर जाजु यांना सर्वांच्या संमतीने देण्यात आले.

ज्येष्ठ नागरिकांसाठी विचारमंच निर्माण करणे व त्यांच्या अनुभवाचा, ज्ञानाचा उपयोग संघटनेच्या माध्यमातुन समाजाचे वैचारिक, राजकीय, सांस्कृतिक वातावरण सुधारण्यासाठी मकल्पवृक्षाचेफ्फ काम करावे असा निर्धार संघटनेने केला.कार्यक्रमाचे संचालन प्रा. हनुमंत भोसले यांनी केले.अध्यक्षीय समारोपानंतर डि.एस.साखरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी तालुक्यातील अनेक ज्येष्ठ नागरिक सभेस उपस्थित होते. चहापानानंतर सभेची सांगता करण्यात आली.

## केज शहरातील राशनधारकांनी ई केवायसी करून घ्यावी असे आवाहन केज तहसीलदार यांनी केले.

### ४ मार्च ते ७ मार्च पर्यंत केज शहरातील राशन दुकानात कॅम्पचे आयोजन- श्री कारेकर

केज/प्रतिनिधी

केज शहरातील राशन धारकांनी राशन दुकानात जाऊन आपली केवायसी करून घ्यावी अन्यथा आपले नाव वगळले जाईल असे केज पुरवठा विभागाचे कर्मचारी श्री कारेकर यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना स्पष्ट केले आहे तर केज शहरातील रेशन लाभधारकांनी मोठ्या संख्येने कॅम्प मध्ये सहभागी होऊन आपली ही केवायसी करून घेण्यात यावी त्याचबरोबर ज्या मुलींचे सासर हे केज येथे आहे परंतु त्यांचे रेशन कार्ड ला नाव त्यांच्या माहेरी म्हणजेच वडिलांच्या रेशन कार्ड मध्ये समाविष्ट आहे अशा महिला मुलींनी देखील या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केज तहसीलदार यांच्या वतीने पुरवठा विभागाचे श्री कारेकर यांनी केले आहे. सध्या आम्ही केज शहरात ४ मार्च ते ७ मार्च२०२५ पर्यंत प्रत्येक राशन दुकानात कॅम्पचे आयोजन केलेले आहे तरी सर्व राशन धारकांनी आपली केवायसी करून घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे. यामध्ये जे राशनधारक बाहेरगावी आहेत परंतु सध्या शहरात राहतात अशा लोकांनी केवायसी करणे गरजेचे आहे. तसेच सध्या अंत्योदय व अन्नसुरक्षा योजना या लोकांनी केवायसी करणे अत्यंत गरजेचे आहे तसेच राशनधारक कुटुंबातील एका सदस्याचा मोबाईल नंबर शिडिंग करणे गरजेचे आहे.

एखाद्या रेशन धारक लाभार्थ्यांची ही केवायसी करायची राहिली तर त्यांचे रेशन कार्ड मधून नाव वगळण्यात येईल व अशा लाभधारकांना शासनाच्या योजनेचा लाभ घेता येणार नाही त्यामुळे सर्व रेशन धारकांनी तात्काळ सदर कॅम्प मध्ये सहभागी होऊन आपली व आपल्या कुटुंबातील सदस्यांची ई केवायसी करून घेण्यात यावी जर एखाद्या सदस्य अथवा राशनधारकांनी त्यांची एक केवायसी नाही केली त्याची सर्वस्वी जबाबदारी त्या रेशन धारकाची अथवा त्या सदस्यांची राहील याची केज शहरातील सर्व रेशन धारक लाभार्थ्यांनी नोंद घेण्यात यावी असे पुरवठा विभागाच्या वतीने सांगण्यात आले आहे. त्याचबरोबर इ केवायसी करण्यासाठी रेशन लाभ धारकांना शासन स्तरावरून कसलेही प्रकारचा शुल्क आकारण्यात येणार नाही सदर केवायसी ही निशुल्क आहे.

# केजच्या नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांना जागतिक स्त्रीरत्न पुरस्कार जाहीर

### जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत भव्य कार्यक्रम सोहळ्यात बीड येथे मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानितकांसाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे- राजेंद्र मस्के

केज/प्रतिनिधी

केजच्या नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांना जागतिक स्त्रीरत्न पुरस्कार नुकत्याच जाहीर करण्यात आला आहे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत भव्य कार्यक्रम सोहळ्यात बीड येथे मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांना कसलाही शैक्षणिक, सामाजिक, राजकीय वारसा नसताना देखील प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सौ. सीताताई प्रदीप बनसोड यांनी उच्च शिक्षण घेतले. एवढेच नव्हे तर गेल्या २५ ते ३० वर्षा पासून सामाजिक संस्थेच्या माध्यमातून व दलित चळवळीच्या माध्यमातून समाज कार्य करत राजकारणामध्ये पदारपण करत गेल्या पंधरा वर्षी पुर्वी केज ग्रामपंचायतची नगरपंचायत झाल्यानंतर प्रथम नगरसेविका झाल्या होत्या त्या नंतर समाज कार्यामध्ये अविरत कार्य करून अनेक महिलांचे संसार यावर पडलेले व्यवस्थित करून अनेक दिन दलित बहुजनांची कामे शासन स्तरावर मार्गी लावली आहे. विविध कमिटीची पदे भूषण सतत सामाजिक राजकीय कार्यामध्ये अग्रेसर राहून स्वतःचे अस्तित्व निर्माण करून स्वतःचे नावलौकिक केले आहे त्याचबरोबर विविध क्षेत्रामध्ये उलटणीय काम करत विविध पुरस्कार प्राप्त केले आहेत. केज नगरीच्या सर्वाधिक कुशल, विकसनशील व कर्तव्यदक्ष नगराध्यक्षा म्हणून सौ. सीताताई बनसोडे यांनी सन्मान मिळवला आहे. शून्यातून विश्व कस निर्माण करावे याचे प्रतीकात्मक रूप म्हणजेच सौ. सीताताई प्रदीप बनसोड होय. त्यांच्या या अभूतपूर्व कार्याची दखल घेऊन त्यांना बीड येथीलआश्रय सेवा केंद्राच्या वतीने




जागतिक महिला दिनी जागतिक स्तरावरील स्त्रीरत्न पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. अमरावती जिल्ह्यातील येवदा या खेड्या गावामध्ये अतिशय सामान्य कुटुंबात सीताताई यांचा देविदास बागडे कुटुंबीयात जन्म झाला. त्यांचे वडील देविदास बागडे, आई बेबीबाई,सीताताई, भाऊ अनिल बागडे,सुधिर बागडे,रंजित बागडे असा परिवार आहे.त्यांचे वडील मजुरी करून कस बस कुटुंबांची उपजीविका चालवत होते.

सीताताई यांना लहानपणापासूनच शिक्षणाची आवड व जिद्द असल्याने त्यांनी परमपूज्य महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात करुन उच्च शिक्षण घेतले आहे. शिक्षण हे वाघिणीचे दूध समजून सत्तेच्या खुर्चीवर जाण्याचे स्वप्न ज्यावेळी पोटभर एक वेळचे जेवण धड मिळत नव्हत अशा परिस्थितीत त्यांनी पाहिले. व स्वकर्तृत्वावर कुठलाही शैक्षणिक,सामाजिक, राजकीय वारसा नसतानाही त्यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करत एक इंग्रजीच्या अध्यापक पासून यशस्वी सामाजिक कार्यापर्यंत आणि पुढे थेट केज नगरीच्या नगराध्यक्षा म्हणून त्यांनी यशस्वी शैक्षणिक सामाजिक आणि राजकीय गरुड झेप घेतली आहे. एवढेच नव्हे तर भविष्यात आता आमदार होण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले आहे ते पूर्ण करण्याच्या दृष्टीने त्यांनी विधायक पावले उचलण्यास सुरुवात देखील केलेली आहे. त्यांच्या या अभूतपूर्व कार्याची दखल घेऊन त्यांना पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जागतिक स्तरावरील स्त्रीरत्न पुरस्कार देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात येणार आहे. हा पुरस्कार त्यांना जाहीर झाल्या बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com